# प्रकरण तिसरे -

## - उपसंहार -

# उपसंहार

तत्त्वज्ञान म्हणजे मानवी जीवनासह सर्व विश्वाचा अर्थ सांगणाऱ्या सामान्य व मूलभूत कल्पनांची सुसंगत व तर्कशुध्द मांडणी होय.

तत्त्व हा शब्द साधारणपणे नेहमी २ अर्थांनी वापरला जातो.

१] या विश्वाच्या बुडाशी असणारे शाश्वत तत्त्व.

२] वस्तुस्थिती, सत्य, यथार्थ स्वरूप, मूलघटक इ.

वरील दोन्ही अर्थाने कालिदास तत्त्वज्ञ होता हे आतापर्यंत आपण दोन्ही प्रकरणांमधून पाहिले.

पैकी पहिल्या प्रकरणामध्ये या विश्वाच्या बुडाशी असणाऱ्या शाश्वत तत्त्वाचा शोध घेणाऱ्या तत्त्वज्ञानाच्या ज्या अनेक शाखा आहेत त्या सर्व शाखांचा कालिदास कसा अभ्यासक होता हे अनेक उल्लेखांसह आपण पाहिले. यावरुन आपल्याला असें दिसून आले कीं -

१] तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथ उदा. उपनिषदे, भगवद्‌गीता, षड्‌दर्शने, [मुख्यत: अद्वैत दर्शन, सांख्यदर्शन व योगदर्शन आणि गौणत्वाने वैशेषिक इ. ] योगशास्त्र इ. या कालिदासाने सखोल अभ्यास केला होता.

२] वेदान्तातील ज्या "अद्वैत तत्त्वज्ञानाने" संपूर्ण जगांत मान्यता मिळवली त्या अद्वैत तत्त्वज्ञानाचा कालिदास पुरस्कर्ता होता. वेदान्ता-सम्बन्धी त्याचा असणारा हा अभिमान त्याच्या ग्रंथात सर्वत्र आढळतो.

३] ब्रह्मा, विष्णु व महेश या तीनही देवतांविषयी त्याच्या मनांत सारखाच आदर वसत असला तरी भगवान् शंकर हेच त्याचे उपास्य दैवत होते. आपल्या या इष्ट देवतेची स्तुती त्याने अनेक ठिकाणी केली आहे.

४] मोक्ष म्हणजे जन्ममरणाच्या फेऱ्यातून कायमची सुटका होय. ही मोक्षप्राप्ति हेच मानवी जीवनाचे अंतिम ध्येय असावे असे त्याचे मत होते. रघुवंशातील अनेक राजांच्या जीवनपध्दतीवरून व अभिज्ञान शाकुंतलात त्याने भगवान् शंकराजवळ केलेल्या प्रार्थनेवरून हेच सिध्द होते. स्वर्गाच्या [स्वर्गसुखाच्या] नश्वरतेविषयीचे अनेक उल्लेखही त्याच्या ग्रंथात आढळतात.

५] कालिदासाला "कर्मवाद" मान्य होता. पुनर्जन्मावर त्याचा विश्वास होता. कर्मामुळेच जीवांना वेगवेगळ्या गती प्राप्त होतात व सुखदु:खेही भोगावी लागतात असे त्याचे मत होते.

"तत्त्वज्ञान" या शब्दामध्ये अनुस्यूत असलेल्या या सर्व गोष्टींचा सखोल विचार त्याने केला होता. तत्संबंधीच्या ग्रंथाचा अभ्यास केला होता, व या सर्वांवरून तयार झालेली आपली मते त्याने आपल्या ग्रंथात स्पष्टपणे प्रतिपादली आहेत.

दुसऱ्या प्रकरणामध्ये जीवनाच्या विविध विषयांतील सत्याचा मागोवा घेणारा म्हणून "तत्त्वज्ञ" असे कालिदासाला म्हटले आहे. तत्त्व या शब्दाचे जे वस्तुस्थिती, सत्य, यथार्थस्वरूप, मूलघटक इ. अर्थ होतात त्या दृष्टीनेही कालिदासाला "तत्त्वज्ञ" म्हणणे योग्य होईल.

मानवाच्या प्रत्येक अनुभवाची उपपत्ती लावणे हे तत्त्वज्ञानाचे कार्य आहे. तत्त्वज्ञानाच्या व्यापक क्षेत्रांत अनुभव बसवता आला पाहिजे. जे जे कांही आपण अनुभवतो, पाहतो, जाणतो, भोगतो, अपेक्षितो ते ते तत्त्वज्ञानाचे सिध्दान्त सिध्द करण्यासाठी उपयुक्त वाटले पाहिजे. आपल्या संस्था, आपले पराक्रम, आपली ध्येये व आपल्या कला यांचे योग्यत्व व अयोग्यत्व तत्त्वज्ञानाच्या योगाने आपल्याला पारखता आले पाहिजे. [भारतीय संस्कृति कोश - पं. महादेवशास्त्री जोशी]

तत्त्वज्ञानाच्या या ज्या कक्षा सांगितलेल्या आहेत या कक्षेत बसणारे तत्त्वज्ञान कालिदासाने प्रतिपादले. ज्या तत्त्वज्ञानाचा पडताळा

जवळजवळ २ हजार वर्षांनी आजही आपणाला येतो. आपल्या जीवनांत येणा-या अनुभवांना, कालिदासाच्या तत्त्वज्ञानाने आपण पारखले असतां ती तत्त्वे किती खरी आहेत याचे प्रत्यंतर आपल्याला येते.

कालिदासाने त्याला जीवनांत भेटलेली माणसे, आलेले अनुभव, घडलेल्या घटना, भोवतालची परिस्थिती यांचा अंतर्मुख होऊन विचार केला. त्यांच्या बाह्य अवडंबराला न भुलता त्यांच्या अंतरंगाचा शोध घेतला. त्यामध्ये लपलेल्या सत्याचा शोध घेतला आणि त्यातून त्याला जे तत्त्वज्ञान गवसले ते त्याने सूत्रबध्द रीतीने आपल्या ग्रंथात मांडले. आलेल्या प्रत्येक अनुभवाने, घटनेने वा व्यक्तीने त्याला कांहीना कांही संदेश दिला. हा संदेश तत्त्वरूपाने त्याने आपल्या ग्रंथात ग्रथित करून ठेवला आहे. म्हणून जीवनाचे तत्त्वज्ञान सांगणारा म्हणूनही त्याला "तत्त्वज्ञ" म्हणणे योग्य होईल. अनातुरोत्कण्ठितयोः......... समानुरागयोः यासारख्या श्लोकांतून त्याने प्रेमाचे तत्त्वज्ञान सांगितले, तर "निसर्गनिपुणाः स्त्रियः" यासारख्या वाक्यातून संपूर्ण स्त्री जातीवर चातुर्याचा शिक्कामोर्तब केला. "गृहिणी-हृतम्" या श्लोकातून पतीच्या जीवनात असणारे पत्नीचे अनन्य-साधारण महत्त्व प्रतिपादले. तर किमिव हि मधुराणां मण्डनं नाकृतीनाम् । या सारख्या वाक्यांतून सौंदर्याचे मर्म प्रकट केले. श्लिष्टा क्रिया........ ....... प्रतिष्ठापयितव्य एव । या सारख्या श्लोकांतून खऱ्या शिक्षकाची व्याख्या सांगितली. तर उपदेशं विदुः............काञ्चनमिवाग्निषु ।। या सारख्या श्लोकांतून खऱ्या विद्येचे महत्त्व प्रतिपादले. "आपन्नार्ति-प्रशमनफलाः संपदो ह्युत्तमानाम् । यामधून सत्पुरुषांच्या जीवनाचे ध्येय सांगितले.

अशा रीतीने कालिदासाच्या ग्रंथात जागोजागी आढळणाऱ्या या सुभाषितांनी वाचकांना मोहित केले नाही तरच नवल. ही सुभाषिते ही कालिदासाच्या अफाट लोकप्रियतेचे एक महत्त्वाचे कारण आहे.

जीवनातील ही सत्ये उलगडून दाखवीत असतांना त्याबाबतीत स्वतःची मते देण्यासही तो विसरला नाही. विवाहित स्त्रीने कसे वागावे ? प्रेमाच्या बाबतीत कोणती दक्षता घ्यावी ? शिक्षणाचा उद्देश काय असावा ? या बाबतीत त्याने मांडलेले विचार हे खरोखरच मननीय आहेत.

जीवनातील हे तत्त्वज्ञान सांगत असतांनाच जीवनाची असणारी नश्वरता, क्षणभंगुरता, मानवाचे असणारे परावलंबित्व तो कधीही विसरला नव्हता हे त्याच्या सर्व ग्रंथांच्या परीक्षणान्ती आपल्याला समजून येते. आपल्या जवळ जवळ सर्व नाटकांमधून आणि काव्यांमधून मानवाचे असणारे असहायत्व त्याने प्रतिपादले आहे. त्यानी निर्माण केलेली पात्रे उदा. दुष्यन्त- शकुंतला, पुरुरवा - उर्वशी, मालविका, यक्ष- यक्षपत्नी, अज, राम- सीता इ. परिस्थितीने जीवनाला कलाटणी मिळाल्यामुळे जीवनाचे तत्त्वज्ञान शिकलेली आहेत. त्यामुळे ती विचारी बनलेली आहेत. यांच्या तोंडून कालिदासाने जीवनाचा खरा अर्थ, जीवनाचे खरे तत्त्वज्ञान प्रकट केले आहे. म्हणूनही कालिदास "तत्त्वज्ञ" होता हे म्हणणे उचित होईल.

[ डॉ. वि. बा. इनामदार ]
मार्गदर्शक

[प्रा. कु. सुधा विष्णू हुकेरी ]
अभ्यासक

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## - संदर्भसूची -


१] अभिज्ञानशाकुन्तलम् - डॉ. रा. शं. वाळिंबे. [एम्. ए. पीएच. डी. ]

२] मालविकाग्निमित्रम् - संपादक, प्रा. गो. श्री. बनहट्टी

३] विक्रमोर्वशीयम् - "विनोद" संस्कृत - हिन्दीव्याख्याद्वयोपेतम्.
व्याख्याकार - डॉ. विन्ध्येश्वरीप्रसादमिश्र:
[एम्. ए. पीएच. डी. ]
बनारस हिंदु विद्यापीठ.

४] रघुवंश - भाषांतरकार - कै. रामचंद्र गणेश बोरवणकर
संपादक - कै. रामचंद्रशास्त्री किंजवडेकर

५] मेघदूत - भाषांतरकार - कै. रामचंद्र गणेश बोरवणकर
संपादक - कै. रामचंद्र दत्तात्रेय किंजवडेकर

६] कालिदासाची नाटके - प्रा. र. पं. कंगले

७] कालिदास - म. म. डॉ. वासुदेव विष्णु मिराशी [एम्. ए. पीएच. डी. ]
संस्कृत भाषेचे अध्यापक, मॉरिस कॉलेज, नागपूर.

८] कालिदासाची सृष्टि - प्रा. मा. दा. आळतेकर

९] संस्कृत नाटके आणि नाटककार - डॉ. गोविन्द केशव भट

१०] संस्कृत काव्याचे पंचप्राण - डॉ. के. ना. वाटवे.

११] सुबोध कुमारसंभव - श्री. विनायक शामराव काळे [कवि बाबुलनाथ]

१२] संस्कृत काव्यवाङ्मय - प्रो. रामचंद्र श्रीपाद जोग

१३] कठ उपनिषदाचे अंतरंग - स्वामी शिवतत्त्वानंद
रामकृष्ण मठ, नागपूर.

१४] मुंडक उपनिषदाचे अंतरंग - स्वामी शिवतत्त्वानंद
रामकृष्ण मठ, नागपूर.

१५] भारतीय संस्कृति कोश - पं. महादेवशास्त्री जोशी.

१६] *Raghuvamsh of Kalidas - G.R.Nandargikar.*

१७] *The Kumarasambhava of Kalidas - Critically Edited by Dr. Suryakanta. M.A.D.PHIL (OXON.) D.LITT (PB.)*

१८] *Kalidasa's Kumarasambhava - Prof.V.R.Nerurkar.*

१९] *India in Kalidas - Dr.B.S.Upadhyaya.*

२०] *Kalidas a Study - Dr.Jhale G.C.*
*St. Xavier's College,*
*Bombay.*

२१] *Kumarsambhava of Kalidas - M.R.Kale*

२२] *"Kalidasa" a Critical Study - Amal Dhari Singh.*
*M.A.(Sans.& Phil.),Ph.D.*
*Aearya (Veda), Sahityaratna.*
*Department of Sanskrit*
*University of Jodhpur.*

२३] *Kalidasa's Raghuvamsh - K.M.Jogalekar.*